# ॲथलेटिक क्रिडा प्रकारात वसंतराव नाईक कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्याचे सूवर्ण यश

ॲथलेटिक क्रिडा प्रकारात वसंतराव नाईक कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय यवतमाळ येथील विद्यार्थ्यांना सुवर्ण, रजत व कास्य पदक मिळवून घवघवीत यश प्राप्त केले. डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापिठ, अकोला, अंतर्गत आंतर महाविद्यालयीन ॲथलेटिक क्रिडा मध्ये महाविद्यालयातील कु. प्राची तायडे या विद्यार्थीनीला भालाफेक या प्रकारात सुवर्ण पदक प्राप्त झाले. तर कु. पुजा शेलोकार हिला २०० मीटर धावणे या प्रकारात रजत तर लांब उडीत सुदधा रजत पदक मिळाले. कु. प्रगती मोरे हिला ४०० मीटर धावणे या प्रकारात कास्य पदक प्राप्त झाले. व कु. अंकिता चाकोते हिला ८०० मीटर धावणे या प्रकारात रजत तर १०० मीटर धावणे या प्रकारत कास्य पदक प्राप्त झाले. तर सचिन दुगा या विद्यार्थ्याला ५ कि. मी. धावणे या प्रकारात कास्य पदक प्राप्त झाले आहे. या आंतर महाविद्यालयीन ॲथलेटिक क्रिडामध्ये १३ विद्यार्थी सहभागी झाले असून पाच विद्यार्थ्यांनी एक सुवर्ण, चार रजत व दोन कास्य असे एकूण ७ पदके महाविद्यालयाच्या नावाने प्राप्त झाले. यापुर्वी ही महाविद्यालयाने शैक्षणिक श्रेत्रात विद्यापिठात तसेच आयसीएआर, एमसीएआर व जेएनयु मध्ये विद्यार्थ्यानी प्राविण्य मिळवून गणमान्य विविध राष्ट्रीय महाविद्यालयामध्ये प्रवेश मिळविला आहे. त्यामध्ये खेळांत सुदधा यश मिळवून महाविद्यालयाच्या शिरपेचात आनखी एक मानाचा तुरा मिळविला आहे. ॲथलेटिक क्रिडामध्ये यश प्राप्त झालेल्या खेळाडूंनी आपल्या यशाचे श्रेय डॉ. राजेंद्र गाडे, सहयोगी अधिष्ठाता, प्राध्यापक व कर्मचारी वृंद यांना दिले. डॉ. राजेंद्र गाडे यांनी विद्यार्थी खेळाडूचे तसेच महाविद्यालयातील प्राध्यापकांचे अभिनंदन केले. महाविद्यालयातील प्राध्यापकांनी सर्व विद्यार्थ्याचे अभिनंदन करत प्राप्त केलेल्या यशाबद्दल कौतुक व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या पालकांनी संपादन केलेल्या यशाबद्दल व तसेच महाविद्यालयाने पुरविलेल्या शैक्षणिक मार्गदर्शन व सोईसुविधांबाबत समाधान व्यक्त केले. याकरिता महाविद्यालयाचे क्रिडा शिक्षक व प्रा. अंजली गहरवार, प्रा. धिरज वसुले, डॉ. रविंद्र सातभाई, डॉ. प्रशांत शिंगोटे, मंगेश शेटे, सहाय्यक कुलसचिव, डॉ. संदेश बांगर, प्रा. हेमंत वाघ, डॉ. रोशन शिंदे, श्री रूपेश राऊत, एकनाथ भंकाळे, निळकंठ मानकर, प्रविण डोगरे, शुभम धार्मिक, रेखा ठाकरे, यांनी परिश्रम घेतले.


DR. PANJABRAO DESHMUKH KRISHI
VIDYAPEETH, AKOLA